**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोरं, पुणे ४११ ००१

श्री.रामकृष्ण हेरंब बोकील
४९८, अ-नारायण पेठ, रामदूत को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
फ्लॅट नं.९, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था(१),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(२),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ~~१७४७~~ १७४८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(२), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.अनीस शेख | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कारभारासंबंधी तक्रारी करून संस्थेवर कारवाई करण्याची मागणी अपीलकर्ता यांनी केली होती. त्यानी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती त्यांना देण्यात आली. अपीलकर्त्यांच्या आई संबंधित संस्थेच्या सभासद असून त्यांच्या तक्रारींबाबत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह सुनावणी घेऊन निर्णय दिला, त्याची प्रत व माहितीही अपीलकर्त्यास दिली. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्यामुळे संस्था स्तरावरील माहितीबाबत सक्ती करता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(१), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.अनीस शेख यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त आहे. अपीलकर्त्याने मूळ अर्जात मागितलेल्या माहितीपेक्षा अतिरिक्त माहिती अपिलांमध्ये व अन्य निवेदनांमध्ये मागितली आहे, ते योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.सुरेखा दत्तात्रय म्हस्के
तर्फे ॲड.श्री.जयराज रामचंद्र विजापुरे,
ए-११, महिम्न सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग,
कर्वेनगर, पुणे-५२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय आयुक्त,
सामान्य प्रशासन, पुणे विभाग,
कौन्सिल हॉल, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त,**
सामान्य प्रशासन, पुणे विभाग, कौन्सिल हॉल, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** विभागीय आयुक्त,<br>सामान्य प्रशासन, पुणे विभाग,<br>कौन्सिल हॉल, पुणे-१ श्री.दिलीप बंड<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उपआयुक्त,<br>सामान्य प्रशासन, पुणे विभाग,<br>कौन्सिल हॉल, पुणे-१ श्री.प्रकाश सं.पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.१.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

झोपडपट्टी कायदा १९७१ च्या कलम ३५ प्रमाणे केलेले अपील आपल्यापुढे न चालविण्याच्या प्रशासक तथा विभागीय आयुक्त, पुणे यांच्या निर्णयाबाबत मागितलेली माहिती विलंबाने व अपुरी दिल्याचे अपीलकर्त्या श्रीमती सुरेखा दत्तात्रय म्हस्के यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रात नमूद केले आहे.

पुणे व पिंपरी शहर विभागाचा समावेश असलेल्या क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सन २००५ मध्ये स्थापन करण्यात आले असून झोपडपट्टी अधिनियमातील काही तरतुदीत फेरबदल लागू करण्यात आले आहेत. त्याबाबतची सर्व माहिती अपीलकर्त्यांना दिलेली आहे. प्रशासक म्हणून विभागीय आयुक्तांनी दिलेल्या निर्णयावर आवश्यक वाटल्यास श्रीमती म्हस्के झोपडपट्टी अधिनियमानुसार अपील करु शकतात, असेही त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन, पुणे विभाग,कौन्सिल हॉल, पुणे-१ श्री.प्रकाश सं.पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सोनोपंत भागूजी दांगट
निवास, कृष्णानगर रोड नं.२, नवी सांगवी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय),
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालय — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय),
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालय

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय),
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालय श्री.ए.आर.देवगुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय),
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालय श्री.सी.बी.भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.५.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.५.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.७.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.९.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्यां मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अपिलीय प्राधिकारी तथा उपनोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय), नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालय यांनी अपील फेटाळल्याचे आदेशात नमूद केले आहे. अपील क्र.१९८५ मधील मूळ दस्त आपल्याला उपलब्ध झाला आहे. मागितलेली माहिती देण्याबाबतची कार्यवाही केल्याचा उल्लेख करणारी दुरुस्ती आदेशात व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सोनोपंत भागूजी दांगट यांनी आयोगाकडील अर्जात केली आहे. अपीलकर्त्यास माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. संबंधित दस्तऐवज शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालयात स्कॅनसाठी पाठविण्यात आला होता. तो उपलब्ध करून देण्याची प्रशासकीय कार्यवाही केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक(मुख्यालय), नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालय श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले. ते रास्त आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशातील दुरुस्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शैलेश बाळकृष्ण खरोटे
२९७, रविवार पेठ, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त, उत्तरवादी
पुणे शहर, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे-२

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ पोलिस निरीक्षक,
खडक पोलिस स्टेशन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २३.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. शैलेश बाळकृष्ण खरोटे<br>२९७, रविवार पेठ, पुणे-२<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ पोलिस निरीक्षक,<br>खडक पोलिस स्टेशन, पुणे श्री. ग. वि. निकम | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

भाडेकरूने आपल्या फलकावर फलक लावला, त्याबाबतच्या तक्रारीची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५चे कलम ८(ग) अन्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलिस निरीक्षक, खडक पोलिस स्टेशन, पुणे यांनी नाकारली. संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल केला नाही. सरकारी अभियोक्ता यांच्याकडून अभिप्राय मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविले. परंतु कारवाई केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता शैलेश बाळकृष्ण खरोटे यांनी केली.

दखलपात्र गुन्हा नसल्याचा अभिप्राय सरकारी अभियोक्ता यांनी दिला. त्यामुळे आवश्यक तर योग्य त्या न्यायालयाकडून दाद मागावी असे अपीलकर्त्यास कळविले, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन, पुणे श्री. जी. व्ही. निकम यांनी नमूद केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५चे कलम ८(जी) ऐवजी ८(ग) चुकीने नमूद केले गेल्याचा खुलासा त्यांनी केला.

कायद्याचे कलम नमूद करताना अचूकता राखणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांना देण्यात येत आहे. सरकारी अभियोक्ता यांनी दिलेल्या अभिप्रायाची प्रत अपीलकर्त्यास त्वरित पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. २४.२.२०१० रोजी संबंधित अभिप्रायाची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात आल्याचे सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, खडक पोलिस स्टेशन, पुणे श्री. ग.वि.निकम यांनी दि. २४.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तुषार देविदास झेंडे
मु.पो.म्हसोबाची वाडी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०४ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तुषार देविदास झेंडे
मु.पो.म्हसोबाची वाडी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.बी.गावीत

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एस.टी.काकडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.५.२००७ व ८.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.तुषार देविदास झेंडे यांनी विस्तृत व ढोबळ स्वरूपात माहिती मागितली होती. राज्यातील सर्व साखर कारखान्यांची माहिती संकलित करून द्यावी, अशी श्री.झेंडे यांची मागणी होती. आपल्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली व सर्व साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्या त्या कारखान्यांची माहिती त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी, असे श्री.झेंडे यांना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.एस.टी.काकडे व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.बी.गावीत यांनी केले.

आपला अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांनी त्या त्या कारखान्याकडे वर्ग करावयास हवा होता, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.तुषार देविदास झेंडे यांनी केले. अनेक कारखान्यांकडे अर्ज वर्ग करून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती मिळवून देण्याची मागणी रास्त नाही. जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे व

अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.२३.३.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किशोर गंगाधर ठेकेदार
अलंकार प्लॉट क्र.२, स्वेदगंगा सह.गृहरचना संस्था, वारजे, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ व
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५ फायनान्स रसता,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२,
बिबवेवाडी कोपरा, सातारा रस्ता, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किशोर गंगाधर ठेकेदार
अलंकार प्लॉट क्र.२, स्वेदगंगा सह.गृहरचना संस्था, वारजे, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ व
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५ फायनान्स रसता,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२,
बिबवेवाडी कोपरा, सातारा रस्ता, पुणे श्री.पी.डी.अहिरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या बंधूंनी सप्टेंबर १९८७ मध्ये केलेला भाडेपट्टा मूळ दस्त वारंवार मागणी करूनही दिला जात नाही. माहितीच्या अधिकाराखाली आपले पत्र सह-दुय्यम निबंधकांनी स्वीकारले नाही व त्याबाबत मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांनी मागविलेल्या खुलासाही त्यांनी दिला नाही. आपल्याला योग्य माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.किशोर गंगाधर ठेकेदार यांनी केली.

श्री.ठेकेदार यांनी मूळ अर्जात अनेक मुद्दयांमध्ये भाष्य करून खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा केली होती. त्यांना मुद्देनिहाय उत्तर दिले. त्यांनी नमूद केलेला दस्त उपलब्ध होत नसून कार्यालय अनेकदा स्थलांतरित झाल्यामुळे अभिलेख विस्कळीत झालेले आहेत व उपलब्ध होताच त्यांना देण्यात येईल, याची कल्पना त्यांना वेळोवेळी दिलेली आहे. त्यांनी प्रथम अपील केलेले नाही. अपीलकर्त्याकडे असणारा दस्त त्यांनी घोषणापत्र/संमतीपत्र करून दिल्यास नोंद करून देता येईल, याचीही कल्पना त्यांना दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२, बिबवेवाडी कोपरा, सातारा रस्ता, पुणे श्री.पी.डी.आहिरे व अपिलीय प्राधिकारी तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार उत्तर देण्यात आले आहे. दस्त नोंदणीबाबतचा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून ती करण्याबाबतची प्रक्रिया जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्ट केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुस्तान हैदरभाई सुजित्रावाला
भाग्योदयनगर, कोंढवा, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळ-४,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त परिमंडळ-४,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त परिमंडळ-४,

पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे श्री.आर.व्ही.बिवल

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

पोलिसांकडील आरोपींच्या यादीतून आपले व आपल्या मुलाचे नाव कमी करण्याबाबत अपीलकर्ता श्री.मुस्तान हैदरभाई सुजित्रावाला यांनी अर्ज केला होता. त्याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती, ती देण्यात आली. तीन मुद्दयांची माहिती सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालयाकडून घ्यावी, असे अपीलकर्त्यास व त्याप्रमाणे माहिती देण्यास सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालयास कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळ-४, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे श्री.आर.व्ही.बिवल यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळ-४, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. मात्र तीन मुद्दयांसाठी सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालयाकडे अर्ज पाच दिवसांत वर्ग करणे आवश्यक होते किंवा त्या कार्यालयाकडून माहिती प्राप्त करून घेऊन द्यावयास हवी होती. याबाबत दक्षता घेण्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळ-४, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यंना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालय, लष्कर, पुणे यांच्याकडून माहिती घेऊन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, परिमंडळ-४, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांनी अपीलकर्त्यास पुरवावी व पूर्तता अहवाल दि.१५.४.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत सदाशिव काळाणे
१८, क्विन्स गार्डन, सी बिल्डिंग, रूम नं.६, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.यशवंत सदाशिव काळाणे
१८, क्विन्स गार्डन, सी बिल्डिंग, रूम नं.६, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

संपादित केलेल्या आपल्या जमिनीचे फाळणी नकाशे मिळण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय, दौंड, जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे वारंवार मागणी करूनही दिले जात नाहीत. एका कार्यालयाकडून दुसऱ्या कार्यालयाकडे अशा प्रकारे टोलवाटोलवी केली जात असून गेली पाच वर्षे आपण हेलपाटे मारत आहोत. फाळणी नकाशा न मिळाल्यामुळे आपल्या चार एकर क्षेत्रातून मूळ मालकाने एक एकर आठ गुंठे क्षेत्र विकले असून ऊर्वरित क्षेत्रातून जवळजवळ वीस गुंठे जमीन रस्त्यासाठी वापरली जाते, त्यामुळे आपल्याला दिलेले क्षेत्र आपल्याला मिळत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.यशवंत सदाशिव काळाणे यांनी केली.

फाळणी नकाशा उपलब्ध नसल्याने माहिती देता आली नाही. नकाशा उपलब्ध नसल्याने जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन नवीन फाळणी नकाशा करावा लागेल. तहीसलदार; पुरंदर, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१३, तालुका निरीक्षक; भूमी अभिलेख; दौंड आदींकडूनही नकाशा मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु ते उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले. श्री.काळाणे यांची वहिवाटविषयक तक्रार असून जमीन महसूल अधिनियमाखाली कार्यवाही करता येईल, असे प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले यांनी केले.

अपीलकर्त्याच्या जमिनीतील अनधिकृत वहिवाटीसंदर्भात कार्यवाही करण्याबाबत व नकाशाप्रमाणे असणारी वहिवाट अंमलात आणण्याबाबत तहसीलदार, दौंड यांच्याकडे जिल्हा पुनर्वसन कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येईल. तसेच मूळ जमीन मालकाशीही चर्चा करण्यात येईल. एक महिन्याच्या कालावधीत अशी कार्यवाही केली जाईल, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.पांडुरंग मगदूम यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. तथापि त्यानुसार कार्यवाही झालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.काळाणे यांनी केली. मोजणी करूनच तक्रारीबाबतचा निर्णय करता येईल, असा अहवाल तहसीलदारांनी दिला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले यांनी नमूद केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.पांडुरंग मगदूम यांनी मान्य केल्याप्रमाणे कोणती कार्यवाही केली याचा अहवाल आयोगाला सादर केलेला नाही. तसेच मूळ कागदपत्रे अ वर्गातील-म्हणजे कायमस्वरूपी जतनाचे असूनही ते उपलब्ध होत नाहीत, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे कोणतेही शुल्क न आकारता एक महिन्यात मोजणी नकाशा तयार करून अपीलकर्त्यास द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्याप्रमाणे दि.३.३.२०१० रोजी जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके यांनी विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१३ व तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड यांना कार्यवाही करण्याबाबत लिहिले होते. परंतु त्यांनी दि.१६.२.२०१० पर्यंत जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे अहवाल सादर केला नसल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आयोगाला सादर केले आहे. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार कोणतेही शुल्क न आकारता मोजणी नकाशा तयार करून देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१३ व ता.नि.भू.अभिलेख, दौंड, जि.पुणे यांना पाठविलेल्या पत्र क्र.पुनर्व/जमीन/कावि/१२/२०१०, दि.१६/२/२०१० व क्र.जिपुअ/वीर/४१/२०१०, दि.५.३.२०१० तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, ता.दौंड, जि.पुणे अनुसार कळविले असतानाही विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१३, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे व तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, ता.दौंड, जि.पुणे यांनी का सादर केला नाही, याच्या खुलाशासह त्यांनी आयोगाला दि.१५.४.२०१० पर्यंत सादर करावा. अन्यथा ते शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

(३) 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मान्य केल्यानुसार अपीलकर्त्याच्या तक्रारी संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.पांडुरंग मगदूम यानी मूळ निवेदनानुसार अहवाल सादर न केल्याबाबतच्या खुलाशासह दि.५.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(४) मूळ अभिलेख अ वर्गातील म्हणजे कायमस्वरूपी जतनाचे असूनही गहाळ झाल्याचे सर्व पातळ्यांवरून अपीलकर्त्यास कळविले जाते, याबाबत चौकशी करून जबाबदार असणारे संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्याविरूध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांनी कारवाई करावी. याबाबतचा अहवाल दि.२५.४.२०१० पर्यंत जिल्हाधिकारी, पुणे यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोरं, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत सोनू जगताप
बी/२/४०२, अनुसया एन्क्लेव्ह, वानवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शशिकांत सोनू जगताप
बी/२/४०२, अनुसया एन्क्लेव्ह, वानवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.एन.व्ही.पुरोहित

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

महाराष्ट्र सहकार अधिनियम, १९६० च्या कलम १५२ अन्वये दाखल झालेल्या दाव्यात त्रयस्थ पक्ष म्हणून आपला समावेश व्हावा, असा अर्ज अपीलकर्ता श्री.शशिकांत सोनाजीराव जगताप यांनी केला होता. आपल्याला संधी का दिली नाही, याबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीत अशा विचारणेचा समावेश होत नाही. संबंधित प्रकरणातील निर्णय मान्य नसल्यास ते योग्य त्या न्यायाधिकरणाकडे दाद मागू शकतात असे त्यांना लेखी व तोंडी स्पष्ट करण्यात आले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एन.व्ही.पुरोहित यांनी केले.

अपीलकर्त्यांनी माहिती मागण्याऐवजी तक्रार केली होती. त्याचे योग्य उत्तर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. राजेंद्र साहेबराव गवळी
बी.११, राजयोग अपार्टमेंट,
सर्व्हे नं.७०/३/१, वडगांव बुद्रुक,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती उत्तर सोलापूर,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत अकोले (काटी),
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२२/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/३/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता :-** श्री. राजेंद्र साहेबराव गवळी<br>**अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी विस्तार अधिकारी (प.)**<br>पंचायत समिती,उत्तर सोलापूर<br>श्री. खरबस एस.एस.<br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**<br>ग्रामपंचायत अकोले (काटी)<br>श्री. व्ही.बी.सिवपुरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/११/२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/११/२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११/१/२००८ |
| ७ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.** | |

## विवेचन

"आयोगासमोरील सुनावणी नुसार जन माहिती अधिकारी यांनी लेखी स्वरुपात माहिती दिली आहे. काही माहिती नंतर देण्याविषयी चर्चा झाली आहे. सबब सदर अपील निकाली काढण्यात यावे," असे निवेदन अपिलकर्ता श्री. राजेंद्र साहेबराव गवळी यांनी दि. १०/३/२०१० रोजी सुनावणीनंतर आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 18 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शरद अच्युत तरडे
१५३, बुधवार पेठ, ३रा मजला, पुणे-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ,
तहसील कार्यालय, वडगाव-मावळ, ता. मावळ, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, तहसील कार्यालय, वडगाव-मावळ,
ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३३/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शरद अच्युत तरडे
१५३, बुधवार पेठ, ३रा मजला, पुणे-२

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ,
तहसील कार्यालय, वडगाव-मावळ, ता. मावळ, जि. पुणे श्री. सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, तहसील कार्यालय, वडगाव-मावळ,
ता. मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.११.२००७ |

६ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपण सन २००७ च्या लीज पेन्डन्सीची नोंद घेण्याबाबत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळाली नाही. संबंधित कागदपत्र मावळ तहसीलदारांकडे पाठविल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले. तहसील कार्यालय, मावळ यांच्याकडे ही माहिती मागितली असता संबंधित अर्ज आपल्याकडे प्राप्त झाला नसल्याचे तेथील जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. सुमारे २०० एकर जमिनीचा हा विषय असून कागदपत्र उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शरद अच्युत तरडे यांनी केली.

संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊनही ती सापडली नाहीत. आवक-जावक नोंद वहीतही त्याची नोंद आढळत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ श्री. राजेश चव्हावण व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ श्री. सचिन बारवकर यांनी सांगितले.

मूळ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडून / अपीलकर्त्याकडून प्राप्त करून घेऊन संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन अपीलकर्त्यास तीन दिवसांत कार्यवाहीबाबतची माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सन २००७ मधील तहसील कार्यालय, मावळ येथील आवक-जावक टपाल नोंदवही समक्ष तपासली असता नोंद आढळली नाही. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात श्री. तरडे यांच्या अर्जाची मूळ प्रत व त्या लगतचे कागदपत्र यांचा शोध घेतला असता कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. अपीलकर्त्याकडे विचारणा केली असता अर्जाच्या प्रतीव्यतिरिक्त पूरक कागदपत्रे त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र लीज पेंडन्सी नोंद घेण्यासंबंधी अन्य अर्ज दि. १४.१२.२००९ रोजी तहसील कार्यालय, मावळ येथे आपण दिला असून त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडली आहेत, असे श्री. तरडे यांनी सांगितले. या अर्जावर केलेल्या कार्यवाहीनुसार संबंधित गटावर लीज पेंडन्सीची नोंद घेण्यात आली असून त्यावर महसूल जमीन अधिनियम, १९६६ चे कलम १४९ मधील तरतुदीनुसार निर्गतीची कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ श्री. राजेश चव्हाण यांनी दि. २३.२.२०१० च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले. संबंधित फेरफार नोंदीची छायांकित प्रत त्यांनी त्यासोबत सादर केली.

अपीलकर्त्यांचा अर्ज व त्या संबंधातील कागदपत्रे नेमकी कोणत्या कार्यालयाकडे आहेत, याबाबत टोलवाटोलवी केली जाणे हे अयोग्य व नियमबाह्य आहे. तथापि अपीलकर्त्यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ श्री. राजेश चव्हाण यांनी प्रशासकीय कार्यवाही अधिक लक्ष घालून केली, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नंदकुमार मनोहर पानसरे
७९०, वेताळपेठ भोर,
जि.पुणे ४१२ २०६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी,
भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्रभारी कर निरीक्षक,
भोर नगरपरिषद भोर, ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे श्री.कैलास बा.गावडे<br>**जन माहिती अधिकारी तथा** प्रभारी कर निरीक्षक, भोर नगरपरिषद भोर, ता.भोर, जि.पुणे श्री.प्रकाश स. भोंडवे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.३.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शेजाऱ्याने करावयाच्या वृक्ष तोडीबाबतच्या आपल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती दिली नाही. झाड तोडण्याबाबत आदेश दिला नाही. झाड तोडावे व तशी माहिती द्यावी व आपल्या तक्रारीबाबतच्या कार्यवाहीची चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नंदकुमार मनोहर पानसरे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात, निवेदनामध्ये व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केली आहे. याबाबतची माहिती त्यांना देण्यात आलेली असून त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कर निरीक्षक, भोर नगरपरिषद भोर, ता.भोर, जि.पुणे श्री.प्रकाश स. भोंडवे यांनी नमूद केले ते रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
दि. 22 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३/३, एलआयजी, सिंधूनगर, सेक्टर-२५, निगडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३/३, एलआयजी, सिंधूनगर, सेक्टर-२५, निगडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे प्रतिनिधी श्री.डी.एन.जोशी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या गाळ्यामधील अतिक्रमणाबाबतची माहिती आपल्याला जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांनी अपुरी दिली. अतिक्रमणाबाबत तक्रार निवारणदिनी आपण तक्रार केली. दप्तर दिरंगाई कायद्यानुसार प्रकरण तीन महिन्यात निकाली निघावयास हवे होते. परंतु अशी कारवाई केली गेली नाही व अशी माहितीही दिली गेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिलीप दिगंबर नवगिरे यांनी केली.

श्री.नवगिरे यांनी २३ मुद्दयांची माहिती मागितली होती. त्यातील काही मुद्दे, खुलासा, स्पष्टीकरण वा संभाव्य कारवाई याबाबतची मागणी करणारे, तसेच काही गाळाधारकांनी अनधिकृत बांधकाम केल्याची तक्रार करून ते न पाडल्याबाबत विचारणा करणारे होते. त्यांच्या मूळ अर्जात व अपिलात भिन्न मुद्दे असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळले. देय माहिती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली. अनधिकृत बांधकामाबाबत पाहणी करून कारवाई करावी, अशी त्यांची मागणी आहे. तीन ते चार पेठांमधील सुमारे ३००० घरांचा हा प्रश्न आहे. यावर विधिमंडळातही चर्चा झाली. त्यानुसार बांधकाम नियमामधील बदलाबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करण्यात आला असून त्यावरील निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.डी.एन.जोशी यांनी केले. श्री.नवगिरे यांनी विशिष्ट

तक्त्यांचे नमुने देऊन त्यानुसार माहिती देण्याची मागणी केली आहे. अशा स्वरूपात संकलन करून माहिती देणे शक्य नाही, असेही श्री.डी.एन.जोशी यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणाऱ्या विषयांनुसार केलेली कार्यवाही योग्य आहे, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिल अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश तुकाराम रेणुसे,
स.नं.२३/४/२, घर नं.२९४,
बालाजीनगर धनकवडी, पुणे-४३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** वरीष्ठ लिपिक,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** प्राचार्य,<br>औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे, जि.पुणे श्री.जी.आर.ब्रम्हपूरकर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** वरीष्ठ लिपिक,<br>औद्योगिक प्रशिक्षण संस्था वेल्हे, जि.पुणे श्री.एस.के.पवार | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०६.०३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.महेश तुकाराम रेणुसे यांनी माहिती मागणीचा मूळ अर्ज आपल्या कार्यालयाकडे केला नव्हता.औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे यांच्याकडे त्यांनी दि.२६.१०.२००७ रोजी केलेल्या अर्जाला संस्थेने दि.३०.१०.२००७ रोजी उत्तर दिले होते व माहिती घेण्याबाबत

कळविले होते. परंतु श्री.रेणुसे आले नाहीत. त्यानंतर नोंदणीकृत पोचदेय टपालाने माहिती पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ लिपिक,औद्येगिक प्रशिक्षण संस्था वेल्हे, जि.पुणे श्री.एस.के.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,औद्येगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे, जि.पुणे श्री.जी.आर.ब्रम्हपूरकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक,औद्येगिक प्रशिक्षण संस्था, वेल्हे, जि.पुणे श्री.एस.के.पवार यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

स्थळ :पुणे
दिनांक : 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. भगवान बाबुराव जगताप — **अपीलकर्ता**
नवीन दत्त मंदिराजवळ,
ता. दौंड, जि. पुणे

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद दौंड,
जि. पुणे — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
नगरपरिषद दौंड,
जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/३/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी नगरपरिषद दौंड,**<br>दौंड नगरपरिषद, दौंड, जि. पुणे<br>श्री. के. व्ही. मुळये | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५/१०/२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १/११/२००७ |
| ६ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.** | |

## विवेचन

" हवी असलेली माहिती संबंधित अधिका-यांकडून मिळाली आहे. आता सदर विषयाबाबत माझी काहीही तक्रार राहिलेली नाही. अपील निकाली काढावे," असे निवेदन अपिलकर्ता श्री. भगवान बाबुराव जगताप यांनी दि. ८/३/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 18 MAR 2010